# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### एसटी प्रवाशांच्या संख्येत ११ कोटींनी घट झाल्याबाबत

**(१) ३५१८६ (१७-१२-२०१५). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहतुक सेवा पुरविणा-या एसटी प्रवाशांच्या संख्येत ११ कोटी ३२ लाखांची घट झाले असल्याचे माहे सप्टेंबर २०१५ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रवासी संख्येत घट झाल्याने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा संचित तोटा १ हजार ९३४ कोटींपेक्षा जास्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, एसटी महामंडळाच्या प्रवासी संख्येत वाढ करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) होय हे खरे आहे. सन २०१३-१४ च्या तुलनेत सन २०१४-१५ मध्ये प्रवासी संख्येत ११.०१ कोटीने घट झालेली आहे. खाजगी वाहतूकदार कमी दरात प्रवासी वाहतूक करत असल्यामूळे त्याचा परिणाम महामंडळाच्या प्रवासी संख्येवर होत आहे.
(२) हे अंशत: खरे आहे एसटी महामंडळ गेल्या काही वर्षापासून तोटयात आहे सन २०१३-१४ मध्ये महामंडळाला रु.५७२.६२ कोटी तोटा झाला होता.सन २०१४-१५ च्या अलेखापरिक्षित वार्षिक लेख्यानूसार महामंडळाला रु.३८२.१३ कोटी तोटा झाला असून, दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजीचा एकूण संचित तोटा रु १६७६.४६ कोटी आहे.
(३) राज्य परिवहन महामंडळाचे भारमान, उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने प्रसारित करण्यात आलेल्या असून उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमित्तिक करारावर देण्यात येणाऱ्या बसेसच्या अटीमध्ये बदल उदा.दिवसाची गणना, खोंळबा आकार माफ, अतिकालिक भत्ता माफ, हिरकणी सेवेत पुश बॅक शिट बसविणे, नविन

वातानुकलित शिवनेरी बसेसची खरेदी, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतुकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यंत प्रवास भाडयात सवलत, वार्षिक सवलत कार्ड, मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे देवसारी, (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील अतिवृष्टी व महापूरामुळे नुकसान झालेल्या मालमत्ताधारकांच्या पुनर्वसनाबाबत**

**(२) ५६४७४ (२२-०८-२०१७). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवसारी, (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील अतिवृष्टी व महापूर यामुळे बाधित झालेल्या मालमत्ताधारकाचे पुनर्वसन माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागातील पूरपिडित व अतिवृष्टीग्रस्त अशा मालमत्ताधारकाचे पुनर्वसनासाठी देण्यात आलेल्या मौजे आंबवन ता.उमरखेड येथील घरकुले व तदर्थ मदत अद्यापपावेतो प्रत्यार्थित करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गावातील नागरीकांच्या पुनर्वसनाचा कार्यक्रम राबविण्याकरिता तसेच विभागीय आयुक्त, अमरावती यांनी जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्याकडुन आवश्यक ती अधिकची माहिती मागविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-१२-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) देवसरी या पुरग्रस्त गावाचे पुनर्वसन करण्याचा विभागीय आयुक्त, अमरावती यांनी शासनास पाठविलेला प्रस्ताव पुरपुनर्वसन धोरणानुसार नसल्याने सदर प्रस्ताव शासनाने अमान्य केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**व्यावसायिक वाहनांना वेग नियंत्रक बसवणे न्यायालयाने बंधनकारक केल्याबाबत**

**(३) ५९४१९ (२४-०८-२०१६). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात व्यावसायिक वाहनांना वेग नियंत्रक बसवणे न्यायालयाने बंधनकारक करून देखील त्याची संपूर्ण अंमलबजावणी झाली नसल्याचे माहे जून २०१६, वा मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबधित विषयाचा प्रस्ताव सुमारे नऊ महिन्यांपूर्वीच शासनाकडे आला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, व्यावसायिक वाहनांना वेग नियंत्रक बसविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१) नाही.

(२) व (३) परिवहन संवर्गातील वाहनांना वेग नियंत्रक बसविण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.०६.०५.२०१७ चे आदेशान्वये सर्व प्रादेशिक/उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांना आदेश दिलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईत वाहनांच्या संख्येत वाढ होत असल्याबाबत**

**(४) ६५०२३ (२६-१०-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सध्या वाहनांच्या संख्येत वाढ होत असून मुंबईत प्रत्येक दिवशी ५९१ नव्या वाहनांची नोंद प्रादेशिक परिवहन कार्यालयात होत असल्याचे दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाहनांमध्ये रिक्षा - टॅक्सी या सार्वजनिक वाहनाऐवजी खाजगी चारचाकी वाहनांची संख्या अधिक असल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईत दिवसेंदिवस पार्किंगची वाढती समस्या प्रत्येक कुटुंबात एका व्यक्तीमागे वाहन, त्यामुळे खाजगी वाहनांचे वाढते प्रमाण, वाहनांच्या तुलनेत मुंबईतील रस्त्यांची संख्या या सर्व कारणांमुळे होत असलेली वाहतूक कोंडी टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) व (२) होय.
(३) वाहतूक कोंडी टाळण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते.
(i) पोलिस विभागाच्या वाहतूक शाखेमार्फत वाहतूक नियमन करण्यात येते.
(ii) वाहतूकीस अडथळा होईल अशा उभ्या केलेल्या वाहनांवर कारवाई करण्यात येते.
(iii) मद्यप्राशन करून वाहन चालविण्याऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते.
(iv) वाहतूक सुरक्षा पंधरवडा आयोजित करून जनजागृती करण्यात येते.
(iv) रस्त्यांवरील वापरात नसलेल्या जागांवर "पे ॲन्ड पार्किंग" सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लवासा सिटी कॉर्पोरेशन लि. (जि.पुणे) यांनी नागरिकांकडून प्रवेशद्वारावर पार्किंग शुल्क कमी आकारण्याबाबत**

**(५) ६७३४८ (१६-१२-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लवासा सिटी कॉर्पोरेशन लि. (जि.पुणे) यांनी नागरिकांकडून प्रवेशद्वारावर पार्किंग शुल्क म्हणून तब्बल पाचशे रुपये आकारले जात असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पार्किंग शुल्काच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात शुल्क आकारून नागरिकांची फसवणूक करत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती या संदर्भात शासनाने पार्किंग शुल्क कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१), (२) व (३) लवासा सिटी ही खाजगी नागरी वसाहत असल्याने पार्कींग शुल्काचे दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या अखत्यारीत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयावर वाहन चालक व मालक यांनी काढलेला 'मूक मोर्चा'.**

**(६) ८१४८२ (१३-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई जि.पालघर येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयावर वाहन चालक व मालक संघटनांनी दिनांक ३१ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास 'मूक मोर्चा' काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेक-यांकडून उप प्रादेशिक परिवहन अधिका-यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निवेदनामधील मागण्यांचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१) व (२) ऑटोरिक्षा चालक मालक महासंघ जि.पालघर या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वसई यांना दि. ३१.०१.२०१७ रोजी निवेदन दिले आहे.
(३) सदर निवेदनाव्दारे केंद्र शासनाने दि.२९.१२.२०१६ च्या अधिसूचनेव्दारे विविध शुल्कात केलेली वाढ रद्द करण्याची मागणी केलेली आहे. दि.२६.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये उशीरा योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी सहमत शुल्क आकारण्यात आले होते. उशीरा योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी आकारण्यात येणारे सहमत शुल्क दि.०५.०४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माण (जि.सातारा) तालुक्यातील दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना पिक नुकसान भरपाई व जनावरांसाठी चारा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(७) ८२८३५ (१३-०४-२०१७). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माण (जि.सातारा) तालुक्यात दुष्काळामुळे काही भागांत पाण्याची टंचाई जाणवू लागली असून पाण्याविना पिके करपू लागल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथे आगामी काळात जनावरांच्या चाऱ्यांचीही समस्या निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय ,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने येथील शेतक-यांना पिक नुकसान भरपाई व जनावरांसाठी चारा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उप प्रादेशिक परिवहन विभाग, यवतमाळ यांनी अवैध जनावराची वाहतुक करणाऱ्या वाहन आणि चालकावर कारवाई करण्याबाबत.**

**(८) ८३५५३ (१३-०४-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उप प्रादेशिक परिवहन विभाग, यवतमाळ आणि पोलिस यंत्रणा यांनी यवतमाळ शहराजवळ भारी येथे जनावरे वाहतुक करणारे दोन ट्रक पकडून जनावराची सुटका केली, परंतु आरोपी विरुद्ध कोणतीही कारवाई केली नसल्याचे दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैधरित्या वाहनात कोंबुन कत्तलीसाठी जनावरे वाहुन नेणाऱ्या वाहनाचा परवाना तसेच चालकाचा परवाना रद्द करण्याचे जिल्हा अधिकारी यवतमाळ यांनी उप प्रादेशिक परिवहन विभागाला आदेश दिले होते परंतु कोणतेही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच जिल्हामध्ये असे प्रकार घडत असताना जाणिवपुर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधीत विभागाचे दोषी अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी पोलिस यंत्रणेमार्फत कार्यवाही करण्यात आली असून त्यांचे पत्र क्र.१००/१७ दि.१४.०३.२०१७ रोजीचे पत्र उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, यवतमाळ यांना दि.१७.०३.२०१७ रोजी प्राप्त झाले.

सदर ३ वाहने दि.१७.०३.२०१७ रोजी सोडण्यात आलेली असल्याने सदर वाहनांवर कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. परंतु, सदर वाहनाचे परवाना व चालकाची अनुज्ञप्ती निलंबन कार्यवाहीखाली आहे.

(२) हे खरे नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यवतमाळ यांचेकडून दि.०१.०१.२०१७ ते दि.३१.०५.२०१७ पर्यत जनावरांच्या वाहतूक करणाऱ्या १६ प्रकरणात वाहनाचा परवाना निलंबन करण्यात आले आहे.

तसेच उपरोक्त प्रकरणात वाहन मालकांना परवाना निलंबन करण्यासाठी कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आलेली आहे. तसेच वाहन चालकांची अनुज्ञप्ती निलंबनाकरीता कारणे दाखवा नोटीस पाठविण्यात आल्या आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

___

**केंद्रीय मोटर वाहन नियमातील विविध शुल्क आकारणीमध्ये वाढ करण्यात आल्याबाबत**

**(९) ८८२४२ (१४-०८-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय मोटर वाहन नियमातील विविध शुल्क आकारणीमध्ये वाढ करण्यात आली असुन यामुळे मालेगांव ता, जि.नाशिक येथील मालवाहतुक मोटार संघटना, मालेगांव ऑटो रिक्षा युनियन, मालेगांव ॲपे प्रवासी संघटना, टु व्हिलन ऑटो युनियन संघटना, परिवहन विभागाशी संबंधित लायसन्स धारक संघटना अशा अनेक संघटनांनी या विरोधात अनेक लेखी व तोंडी स्वरुपाच्या तक्रारी केल्या असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त नवीन वाढीव शुल्कानुसार मनमाड चौफुली आग्रारोड येथे वसुली केली जात आहे त्यानुसार सदरहू वाढ कमी करण्याबाबत यापुर्वीही नविन आग्रारोड येथे रास्तारोको केला असुनही याबाबत आवश्यक कार्यवाही अदयापही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) : (**१) होय, हे खरे आहे.

या संदर्भात स्थानिक संघटनांची निवेदने उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, मालेगांव यांना प्राप्त झालेली आहेत.

(२) व (३) सदर शुल्कवाढ दि.२९.१२.२०१६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे केंन्द्र शासनाने केली आहे. सदर शुल्क वाढ कमी करण्यासाठी दि. २१.०३.२०१७ रोजीच्या अधिसूचनेव्दारे केंद्र शासनाने राज्यापुरती कमी करण्यास राज्य शासनास अधिकार दिले आहेत. त्यास अनुसरून दि.२६.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये उशीरा योग्यता प्रमाणपत्र नुतनीकरणासाठी आकारण्यात आलेले सहमत शुल्क दि.०५.०४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**पावसामुळे झालेल्या घरांसाठी नुकसान भरपाई देण्याचे निकष ठरविण्याबाबत**

**(१०) ९३७७९ (१६-०८-२०१७). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ६५ मिमी पावसाची नोंद झाल्यास पडलेल्या घरांसाठी नुकसान भरपाई देण्यास शासनाचे धोरण आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील व शहरालगतच्या भागातील नाले तुंबल्यामुळे सदरच्या घरामध्ये पानी जमा होऊन घरांचे नुकसान झाले अशा घरांची नुकसान भरपाई देण्याचे शासनाचे निकष नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अशा घरांना नुकसान भरपाई देण्यासाठी पाऊस पडल्यानंतर ८ ते १० दिवसांनी पंचनामा करून त्यांना नुकसान भरपाई देण्याचे निकष ठरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाचे करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत बनावट परवानाच्या टॅक्सी रस्त्यावर चालविण्यात येत असल्याबाबत.**

**(११) ९४९२४ (२२-०९-२०१७). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील रस्त्यावर बनावट परवानाच्या टॅक्सी चालविण्यात येत असल्याबाबचे माहिती अधिकाराअंतर्गत मिळालेल्या माहितीमध्ये दिनांक १६ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बनावट परवानाच्या टॅक्सी पकडल्यानंतर भंगारात काढण्याऐवजी त्या बनावट कागदपत्राच्या आधारावर दुसऱ्याच्या नावे दाखविल्या जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी ताडदेव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश परिवहन आयुक्त यांनी ताडदेव परिवहन कार्यालयांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) व (२) याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी दि.१६.०८.२०१७ रोजी माहिती अधिनियमांतर्गत टॅक्सी परमीट क्र.४०६०/सी/९० याबाबतची मिळण्याकरीता प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) या कार्यालयात अर्ज केला होता. ताडदेव पोलिस स्टेशनकडून प्राप्त माहितीनुसार सदर बाब निर्दशनास आलेली आहे.

टॅक्सी क्र.MH-०१-G-०४९२ या टॅक्सी वाहनाचा परवाना क्र.२६/१५६ ची मुदत दि.२६.०३.२०११ रोजी संपली होती. दि.११.११.२०११ रोजी बनावट कागदपत्रे व कार्यालयाची दिशाभूल करून वाहन मालकाने अवैधरित्या परवाना हस्तांतरीत करून घेतल्याचे निदर्शनास आले. वाहन मालक मुलुंड येथे स्थलातंरीत झाल्याने त्याने प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व) येथे पत्ता बदलण्याकरीता टॅक्सी वाहनाचे व परवान्याचे दि.१७.०१.२०१२ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांचेकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले.

उपरोक्त बाब निदर्शनास आल्यावर प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांनी दि.१७.१२.२०१६ रोजी प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांना परवाना रद्द करण्याबाबत कळविले. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व) यांनी दि.२७.०२.२०१७ रोजी

सदर  परवाना रद्द केला. तसेच वाहन जप्त करून वाहनाचे कागदपत्र जप्त करण्यात आली.

(३) व (४) सदर प्रकरणी दि.०९.०६.२०१५ रोजीच्या पत्रान्वये परिवहन आयुक्त यांनी प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य) यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांनी दि.३०.०६.२०१७ रोजी पोलिस स्टेशन ताडदेव, मुंबई येथे तक्रार दाखल केली आहे. सदर प्रकरण पोलिस स्टेशन ताडदेव, मुंबई यांचेकडे अन्वेषणाधिन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई व ठाणे परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्तांना शासकीय निकषानुसार मदत देण्याबाबत

**(१२) ९५५०६ (२९-१२-२०१७). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, ठाणे परिसरात दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधित नुकसानग्रस्तांना शासकीय निकषानुसार मदत दिली जात नसल्याचे लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे सदर नुकसानग्रस्तांना मदत देण्याची मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती अतिवृष्टीमुळे बाधित नुकसानग्रस्तांना शासकीय निकषानुसार मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१)  सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) व (३) मुंबई व ठाणे येथे दिनांक २९ ऑगस्ट, २०१७ रोजीच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आलेले आहेत.

त्यानुसार शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार मुंबई उपनगरातील बाधित झालेल्या ४६ पात्र कुटुंबियांना प्रत्येकी रु. ३८००/- प्रमाणे मदतीचे वाटप करण्यात आले आहे. तसेच ठाणे जिल्ह्यातील १८ बाधित कुटुंबियांना एकूण रु.९३,६००/- एवढी मदत देण्यात आली आहे. मुंबई शहर, मुंबई उपनगर व ठाणे जिल्ह्यात सदर अतिवृष्टीमुळे मृत झालेल्या १४ पैकी १२ मृत व्यक्तींच्या वारसांना प्रत्येकी रु.४ लक्ष प्रमाणे मदत वाटप करण्यात आली असून १ व्यक्तीच्या वारसांना मदत देण्याबाबतची कारवाई सुरु असून उर्वरित एका व्यक्तीच्या वारसांनी मदत घेण्यास नकार दिल्याने सदर रक्कम शासनजमा करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन विभागाने कायदेशीर वाहने चालविण्यासाठी रिक्षा टॅक्सी अभय योजना सुरू करण्याबाबत**

**(१३) ९९०७८ (२७-१२-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन विभागाने रिक्षा आणि टॅक्सी चालविण्यासाठी परवाना घेण्याची पध्दत बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या राज्यात बेकायदा चालणाऱ्या रिक्षा व टॅक्सी वाहनांची राज्यातील संख्या दोन लाखांच्या आसपास आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बेकायदा चालणाऱ्या रिक्षा व टॅक्सींना शुल्क भरून कायदेशीर वाहने चालविण्यासाठी रिक्षा टॅक्सी अभय योजना सुरू करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) शासनाने दिनांक २६.११.१९९७ च्या अधिसूचनेन्वये राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, सोलापूर, नाशिक, औरंगाबाद या शहरातील ऑटोरिक्षा टॅक्सी यांच्या परवान्यावर निर्बंध घातले होते. सदर अधिसूचनेच्या अनुषंगाने जिल्हयातील प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी त्यांच्या जिल्हयात परवान्यावर निर्बंध घातलेले होते. यांसदर्भात शासनाने निर्णय घेऊन दिनांक १७.०६.२०१७ च्या आदेशान्वये सदरचे परवाने खुले केले आहेत. तसेच विविध प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांनी घातलेले निर्बंधाबाबतचेही ठराव रद्द केलेले आहेत.

(२) होय.

(३) व (४) दिनांक २२.०९.२०१७ च्या अधिसूचनेन्वये खाजगी संवर्गात नोंदणी झालेल्या ऑटोरिक्षांना नवीन परवान्यावर परिवहन संवर्गात नोंदणी करण्यास अतिरिक्त शुल्क आकारून मान्यता देण्यात आलेली होती. त्यानुसार दिनांक ३१.०३.२०१८ पर्यंत २५५ खाजगी ऑटोरिक्षांची परिवहन संवर्गातील परवान्यावर नोंदणी केलेली आहे. राज्यातील बेकायदेशिर रिक्षा वाहनांवर कारवाई करणेबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयांना आदेश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार याबाबत वेळोवेळी मोहीम राबवून कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकलूज (जि. सोलापूर) येथील उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना एजंटपासून संरक्षण देण्याबाबत**

**(१४) १११६१३ (०१-०४-२०१८). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकलूज (जि.सोलापूर) येथील उप-प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांना एजंट व त्यांच्या हस्तकांकडून वारंवार मारहाण केली जात असल्याबाबत कर्मचारी व अधिकारी यांनी राज्यशासनाच्या परिवहन विभागाकडे तक्रार करुनसुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची सर्वसाधारण कारणे काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना एजंटपासून संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१), (२) आणि (३) प्रस्तुत प्रकरणी अकलूज पोलीस ठाणे येथे एफआयआर ०६३५/२०१७ दि.२१.१२.२०१७ दाखल केली आहे. आरोपीविरुद्ध मा. प्रथमवर्ग न्याय दंडाधिकारी, माळशिरस न्यायालय, माळशिरस यांचे कोर्टात दोषारोपपत्र पाठविण्यात आले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ (RCC No. १६२/२०१८) आहे.
(४) कार्यालयामध्ये अनधिकृत व्यक्ती येत असल्याच्या आणि कायदेशीर शुल्काव्यतिरिक्त अधिक रक्कम घेत असल्यास अशा व्यक्तींविरुद्ध कडक कारवाई करण्याच्या सूचना परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत दि.१५.०७.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे कार्यालयाच्या आवारात पोलीस गस्त पथकामार्फत तपासणी करण्याच्या सूचना पोलीस निरीक्षक, अकलूज पोलीस ठाणे, अकलूज यांना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई शहरातील खासगी व अनुदानीत शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थीनींची वाहतूक करणा-या वाहनातील वाहकांकडून अटी व नियमांचे पालन करण्यात येत नसल्याबाबत**

**(१५) ११४६५८ (०१-०४-२०१८). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरातील खासगी व अनुदानीत शाळांमधील विद्यार्थी-विद्यार्थीनींची वाहतूक करणाऱ्या वाहनातील वाहकांकडून अटी व नियमांचे पालन करण्यात येत नसल्याने व प्रमाणापेक्षा जास्त विद्यार्थी वाहनात कोंबून नेले जात असल्याने अशा वाहनांचे परवाने रद्द करावेत असे आदेश मा.उच्च न्यायालयाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अंमलबजावणी केली आहे काय व आतापर्यंत किती वाहनांचे परवाने रद्द करण्यात आले वा येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५४६ (१२)

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

मा.उच्च न्यायालयात दाखल जनहित याचिका क्र.९७/२०१४ मध्ये दि.२२.०१.२०१८ रोजीच्या आदेशामध्ये महाराष्ट्र मोटर वाहन (स्कूल बस करीता विनियम) नियम २०११ मधील नियम ५ व नियम ५ (२) नुसार जिल्हा स्कूल बस सुरक्षितता समिती व शाळेमध्ये परिवहन समितीने शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कार्यवाही करावी म्हणून निर्देश दिले आहेत.

(२) शालेय विद्यार्थ्यांची वाहतुक करणाऱ्या राज्यातील स्कूल बसेस व इतर खाजगी वाहनांची एप्रिल-२०१७ ते डिसेंबर, २०१७ या कालावधीत नियमितपणे तपासणी करण्यात आली.त्यानुसार १०५०३ बसेसची तपासणी करण्यात आली असता २३२६ स्कूल बसेस दोषी आढळून आल्या तर १६७२ बसेस स्कूल बस परवाना नसताना वाहतूक करीत असल्याचे निदर्शास आले. त्यापैकी १०१० वाहने अटकावून ठेवून रू.१.३७ कोटी इतका महसूल जमा करण्यात आलेला आहे.

तसेच मुंबईतील प्रादेशिक परिवहन कार्यालयांनी माहे एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत केलेली कारवाई खालीलप्रमाणे आहे:-

| प्रा.प. कार्यालये | दोषी वाहने | | निकाली प्रकरणे | एकूण वसूली | परवाना/ नोदंणी निलंबन | अनुज्ञप्ती निलंबन |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्कूल बस | स्कूल बस परवाना नसतांना वाहतूक करणारी वाहने | | | | |
| मुंबई (मध्य) | ३१८ | | २३९ | ७०९७५० | १०७ | २११ |
| मुंबई पश्चिम) | ४६८ | | - | ७७९६७३ | ६२ | - |
| मुंबई (पूर्व) | ११६ | ८५ | १४१ | १३४००० | ३५ | - |
| बोरीवली | ४१ | ७० | - | १७२६०० | १९ | - |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती येथील विशेष तपास पथकाने (एसआयटी) शेतकरी व शेतमजुरांवर कारवाई करण्याच्या शिफारशी केल्याबाबत**

**(१६) ११५९९८ (१२-०४-२०१८). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथील विशेष तपास पथकाने (एसआयटी) मंत्रीमंडळासमोर सादर केलेल्या अहवालात शेतकरी व शेतमजुरांवर कारवाई करणा-या शिफारशींचा शेतकरी स्वावलंबन मिशनद्वारा विरोध करण्यात आला असुन कीटकनाशक कंपन्याची जबाबदारी टाळून त्यांना अभय देणारा हा अहवाल असल्याचा आरोप शेतकरी स्वावलंबन मिशनद्वारा करण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कीटकनाशकांवर पिकांचे लेबल नसतांनासुध्दा सर्व नियम व कायदे धाब्यावर बसवून बियाणे विक्री करणा-या कंपन्यावर कोणतीही कारवाई करण्याविषयी या अहवालात उल्लेख करण्यात आला नसून कृषी व आरोग्य विभागासह कीटकनाशक कंपन्यावर कोणतीच जबाबदारी निश्चित न करता सर्व जबाबदारी निर्दोष शेतकरी व शेतमजुरांवर टाकली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांना निर्दोष ठरवून त्यांची होणारी पिळवणुक थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :**

(१) शेतकरी स्वावलंबन मिशनद्वारा विरोध करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही. यवतमाळ जिल्हयात पिकांवर किटकनाशक फवारणी करताना शेतकरी व शेतमजूर यांना झालेल्या विषबाधेसंदर्भात, चौकशी करुन अहवाल सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त महसूल) अमरावती) यांच्या अध्यक्षतेखाली, विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले होते. विशेष तपास पथकाने सादर केलेल्या अहवालामध्ये शेतकरी व शेतमजुरांवर कारवाई करण्याची कोणतीही शिफारस केलेली नाही.

किटकनाशकांची फवारणी करताना शेतकरी व शेतमजूर यांनी केवळ तोंडाला रुमाल बांधून तोकडया, उघडया अंगाने संरक्षण कपडयाविना, मास्क, गॉगल, हातमोजे, टोपी, बुट, ॲप्रॉन इ. साहित्य न वापरल्यामुळे विषबाधेची शक्यता वाढल्याचे अहवालाद्वारे निदर्शनास आणलेले आहे. तसेच, फवारणी झाल्यानंतर स्वच्छ आंघोळ न करणे फवारणी दरम्यान वापरलेले कपडे न बदलणे, उष्णतामान जास्त असल्यामुळे कमी कपडयांचा वापर करणे तसेच फवारणी करताना हात न धुताच तंबाखू/ खर्रा खाणे, विडी पीणे व इतर सवयीमुळे विषबाधा झाल्याची शक्यता अहवालाद्वारे निदर्शनास आणलेली आहे.

सदर अहवालाच्या अनुषंगाने, भारतीय दंड संहिता, १८६० मधील ३०४-A अंतर्गत यवतमाळ जिल्हयात मे. युपीएल लि. उत्पादकावर व दोन किटकनाशके विक्रेत्यांवर त्यांचे मोनोक्रोटोफॉस ३६% एस एल या किटकनाशकांच्या अनुषंगाने गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत.

(२) नाही.

किटकनाशके कायदा, १९६८ व किटकनाशके नियम, १९७१ मधील तरतूदीनुसार मे. युपीएल कंपनी व घरडा कंपनी तसेच ११ कृषी केंद्रांविरध्द पोलीस गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच, अकोला येथे किटकनाशकाचा एकूण २१०५२.७० कि.ग्रॅ मूल्य रु. २२५.६४ लक्ष चा साठा जप्त केला असून २९०.०८ मे. टन मुल्य रुपये १४७६.७० लक्ष चा साठा विक्रीबंद केलेला आहे. तसेच ६ कंपन्यांचे परवाने रद्द करण्यात आलेले आहेत.

बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्यासंदर्भात विशेष तपासणी पथक स्वतंत्रपणे स्थापन करण्यात आलेले असल्यामुळे या अहवालामध्ये बियाणे कंपन्यांवर करण्यात आलेल्या कारवाईचा उल्लेख नाही.

(३) कीटकनाशकांच्या हाताळणीमुळे होणारी विषबाधा रोखण्यासाठी सुमारे सहा लाख पेक्षा जास्त शेतमजूर/शेतकरी यांना प्रशिक्षण, कार्यशाळांद्वारे उत्पादक, वितरक व विक्रेते यांना मार्गदर्शन, कीटकनाशकांच्या काळजीपुर्वक हाताळणीसाठी पोस्टर्स, जिंगल्स, माहितीपत्रिका, फवारणी करणाऱ्या शेतमजुर/शेतकरी यांची आरोग्य तपासणी शिबिरे, आकाशवाणी केंद्रावर प्रक्षेपणे, दुरदर्शनवर कार्यक्रम प्रसिद्धी इत्यादीद्वारे जनजागृती करण्यात आलेली आहे. तसेच शेतकरी व शेतमजुरांना संरक्षण कीटस् उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यांचेकरीता मोबाईल संगणक प्रणालीद्वारे दोन कोटी पेक्षा जास्त संदेश पाठविण्यात आले आहेत.

ज्या कीटकनाशकांमुळे शेतमजूर / शेतकरी यांना विषबाधा झालेली आहे अशा पाच कीटकनाशकांच्या वितरण, विक्री व वापरावर कायमस्वरुपी बंदी घालण्याची विनंती दिनांक २७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास करण्यात आलेली आहे.

तसेच, राज्यात किटकनाशक विषबाधा प्रकरणी मृत्यू झालेल्या शेतमजूर/ शेतकरी यांच्या कुटूंबियांना प्रत्येकी एकसमान रु. ४.०० लाख प्रमाणे आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील खासगी बस वाहतूकदारांकडून प्रवाश्यांची लुट होत असल्याबाबत

**(१७) ११६८६६ (२३-०७-२०१८) अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, पुणे व नागपूर शहरात दिवाळी, होळी, नाताळ, गणपती आणि उन्हाळ्याच्या सुट्ट्यांच्या कालावधीत खाजगी बसच्या तिकीट दरात वाढीचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे माहे एप्रिल २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी बस चालकांकडून एस टी बस भाडेदराच्या तुलनेत दीड पटीपेक्षा भाडे आकारले जाणे तसेच दरवाढीमुळे नागरिकांना भुर्दंड सहन करावा लागत असून खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीने शहराच्या मुख्य रस्त्यावर कार्यालये उभारुन रस्त्यावर वाहतुक कोंडी केल्याने प्रवासी वाहतुकीस अडथळा निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रवास भाडेवाढ करुन प्रवाशांची लूट करणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीवर व अशा खाजगी ट्रॅव्हल्स कंपनीच्या भाडेवाढीवर नियंत्रण न ठेवणाऱ्या परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन खाजगी प्रवासी भाडे नियंत्रणात ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) खाजगी बस चालकांकडून एसटी बस भाडेदराच्या तुलनेत दिड पटीपेक्षा जास्त भाडे आकारले गेल्याच्या ७६ तक्रारीं प्राप्त झाल्या. त्यापैकी ०२ प्रकरणात तसे निदर्शनास आलेले आहे. खाजगी बसच्या मनमानी भाडे आकारणीबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे त्या त्या टप्पा वाहतूकीचे भाडेदर विचारात घेऊन खाजगी कंत्राटी परवाना वाहनाचे त्या संवर्गासाठी संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रती कि.मी. भाडे दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक राहणार नाही, असे कमाल भाडेदर दि.२७.०४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहे.

जादा भाडेवाढ रोखण्यासाठी खाजगी कंत्राटी वाहनांच्या बुकींगच्या जागी भेट देण्याचे व कारवाई करण्याबाबतचे तसेच खाजगी बस मालकांनी पूर्ण बससाठी आकारावयाचे महत्तम भाडेबाबतचा तक्ता तयार करून त्याप्रमाणे येणारा प्रती आसन दर दर्शवून सदर खाजगी कंत्राटी वाहने ज्या ठिकाणाहून सुटतात, अशा ठिकाणी प्रवाशांच्या माहितीसाठी प्रदर्शित करण्याबाबतचे आदेश सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देण्यात आलेले आहेतव त्याप्रमाणे प्रदर्शित करण्यात आले आहेत. खाजगी बस चालकांकडून एसटी बस भाडेदराच्या तुलनेत ५० टक्के पेक्षा जास्त भाडे आकारल्याबाबतच्या एकूण ०२ प्रकरणी कारवाई करण्यात आली असून रू.९,४००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील वाहनांच्या प्रदूषण निर्देशांकाचा आढावा घेण्यासाठी 'पीयूसी' प्रमाणपत्र सक्तीचे असल्याबाबत

**(१८) ११६९०७ (२३-०७-२०१८). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहनाच्या प्रदूषण निर्देशांकाचा आढावा घेण्यासाठी 'पीयूसी' प्रमाणपत्र घेणे सक्तीचे असतांना बेस्ट प्रशासनाने पूर्तता केलेली नसुन ३३८० बसपैकी ४११ वाहनांसाठी 'पीयूसी' प्रमाणपत्र घेतले नसल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार वाहनांचे पीयूसी प्रमाणपत्र देण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.
(२) बेस्ट उपक्रमातील बसेस व इतर वाहनांची मोटार वाहन कायद्यामधील तरतूदीनुसार प्रत्येक सहा महिन्याच्या आत वायुप्रदूषणाबाबत नियमितपणे तपासणी करण्यात येते. बेस्ट उपक्रमाचे वाहन वायुप्रदूषण वैध प्रमाणपत्राशिवाय धावत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबइतील अंधेरी (प) येथील जे पी रोड व व्ही पी रोडवर अनधिकृत ऑटोरिक्षा असल्याबाबत

**(१९) ११६९५७ (२४-०७-२०१८). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी (प) येथील जे पी रोड व व्ही पी रोडवरील अनधिकृत ऑटोरिक्षांच्या थैमांनाची स्थानिक नागरीकांनी व लोकप्रतिनिधीनी अंधेरी आरटीओ व डीएन नगर वाहतूक विभाग, सह आयुक्त वाहतुक व परिवहन आयुक्त यांना तक्रारी केल्याचे माहे मे, २०१८ वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारींवर अंधेरी आरटीओ व डीएन नगर वाहतूक विभाग यांनी अनधिकृत ऑटोरिक्षांवर कोणती कारवाई केली आहे, तसेच कारवाई केल्यानंतरही त्या ठिकाणी अनधिकृत ऑटोरिक्षा धावत असून प्रवाशांकडून जास्त भाडे आकारणी केली जात आहे, तसेच कालबाहय झालेल्या ऑटो रिक्षांमुळे प्रवाशांच्या जीवाला धोका संभवत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे, तद्नुसार अंधेरी (प) येथे अनधिकृत ऑटोरिक्षाबाबत कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) या कार्यालयाच्या वायुवेगपथक क्रमांक १, २ व ३ मार्फत व्ही.पी. रोड तसेच जे.पी. रोड तसेच आसपासच्या परिसरात अवैध ऑटोरिक्षाविरुध्द दि.०१.०४.२०१७ ते दि.३१.०७.२०१८ या कालावधीत विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आलेली आहे.

सदर विशेष तपासणी मोहिमेत ५०८ वाहनांची तपासणी करण्यात आली असता १६३ वाहने दोषी आढळून आलेली आहे. त्यात अवैध प्रवास करणारी १०१ वाहने, १३ खाजगी ऑटोरिक्षांचा समावेश आहे. तसेच ४८ वाहने जप्त करण्यात आलेली आहे. सदर कारवाईतून दंड स्वरूपात रू.२,६४,२५०/- इतका महसूल शासनखाती जमा करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत

**(२०) ११७०७१ (२३-०७-२०१८) श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभाग व राज्य परिवहन महामंडळाच्या संयुक्त विद्‌यमाने एस.टी.कर्मचाऱ्यांसाठी १०० खाटांचे अत्याधुनिक रुग्णालय तसेच त्यांच्या पाल्यांसाठी ऑटोमोबाईल व मेकॅनिकल अभियंता महाविद्‌यालय उभारण्याचा निर्णय घेतला असून सदरील प्रकल्पाची आखणी करण्यासाठी तज्ञ सल्लागार संस्थेची निवड करणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार रुग्णालय व अभियांत्रिकी महाविद्‌यालय उभारण्यासबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) होय.

(२) व (३) सदर प्रकल्पाची व्याप्ती व प्रस्तावित प्रकल्पाच्या ठिकाणात बदल झाल्यामुळे त्यास नव्याने मंजूरी देण्याची बाब कार्यवाहीखाली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील ऑटोरिक्षा व टॅक्सी सी.एन.जी.गॅस तपासणीबाबतचे प्रमाणपत्र मिळण्याबाबतची फी खाजगी केंद्रांनी वाढविल्याबाबत

**(२१) ११७५७३ (२३-०७-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ऑटोरिक्षा व टॅक्सी सी.एन.जी.गॅस तपासणीचे योग्यता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी पूर्वी ८०० ते १००० रुपये आकरण्यात येत होते परंतु सद्यस्थितीत खाजगी केंद्रांनी हया गॅस तपासणीचे योग्यता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी रु.२४०० फी केल्याचे माहे मे २०१८ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सी.एन.जी.गॅस तपासणीच्या खाजगी केंद्राने फी वाढ केल्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१) व (२) सीएनजी सिलेंडर्सची हायड्रो टेस्ट ही दर ३ वर्षानी गॅस सिलेंडर अधिनियम, २०१६ च्या नियम-३५ मधील परिशिष्ट-४ अन्वये करणे अनिवार्य आहे. सदर चाचणी ही दर तीन वर्षातून एकदा करून घ्यावी लागते. सीएनजी सिलेंडर्सच्या चाचणी साठीच्या दरावर मोटार वाहन विभागाचे थेट नियंत्रण नाही. तथापि, परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत अशा चाचणी केंद्रांना वाजवी शुल्क आकारण्याबाबत कळविण्यात यावे, असे शासनाने निर्देश दिलेले आहेत.

टॅक्सी/रिक्षा चालकांची लुबाडणूक होऊ नये तसेच सीएनजी सिलेंडर हायड्रो टेस्टमध्ये कंपन्या आकारत असणाऱ्या दरवाढीबाबत सर्व वाहनांचे वायु इंधन सिलेंडर्स हायड्रो टेस्ट प्रमाणपत्रांची काळजीपूर्वक तपासणी करण्याबाबत व तपासणी प्रमाणपत्र बनावट आढळणाऱ्या वाहन मालकांवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाव्दारा दि.२०.०४.२०१८ च्या परिपत्रकान्वये सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तसेच मुख्य नियंत्रक विस्फोटक विभाग, नागपूर यांनी सुचीत केल्यानुसार वापरातील वाहनांचे गॅस सिलेंडर काढण्याची व बसविण्याची परवानगी विवक्षित सुरक्षा सुविधा असणाऱ्या मान्यताप्राप्त हायड्रो टेस्टींग कंपन्याव्यतिरिक्त इतरास नसल्याने यापुढे सीएनजी रेट्रोफिटर्सकडून असे काम होणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि.२६.०४.२०१८ च्या परिपत्रकान्वये सर्व प्रादेशिक/उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रपतीपदक विजेते एसटी महामंडळाच्या मोफत प्रवासाच्या सुविधेपासून वंचित राहिल्याबाबत**

**(२२) १२१५८९ (२४-०७-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पुरस्कार प्राप्त व्यक्तीमागे एसटी महामंडळाला राज्य शासनाकडून दरवर्षी अकरा हजार रुपये दिले जात असून राष्ट्रपतीपदक विजेते या सुविधेपासून वंचित राहत असल्याचे दिनांक २१ मे,२०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-तिकिटिंगच्या उपकरणात नोंद नसल्यामुळे राष्ट्रपतीपदक विजेते एसटी महामंडळाच्या मोफत प्रवासाच्या सुविधेपासून वंचित राहत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :**
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून विविध प्रवासी वर्गाला प्रवासी भाड्यात सवलती देण्यात येतात. या सवलत योजनांचा आढावा घेवून शासन निर्णय, दि.०९.१०.२०१८ नुसार सुधारणा करण्यात आली आहे. सदर प्रवास सवलत योजनांमध्ये सामाजिक व क्रिडा क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणाऱ्या पुरस्कार प्राप्त व्यक्तिंचाही समावेश केलेला आहे.

सद्यस्थितीत राज्य व केंद्र शासनामार्फत देण्यात येणाऱ्या एकूण ९ पुरस्कारांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत १००% प्रवास सवलत अनुज्ञेय केली आहे.
यामध्ये राज्य शासनाचे शिवछत्रपती पुरस्कार, दादाजी कोंडदेव पुरस्कार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार, राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार, अपंग गुणवंत कामगार पुरस्कार व आदिवासी सेवक पुरस्कार, तसेच केंद्र शासनाच्या पुरस्कारांमध्ये अर्जुन व द्रोणाचार्य या पुरस्कारांचा समावेश आहे. सदर पुरस्कार्थींना देण्यात येणाऱ्या प्रवास सवलतीची १००% प्रतिपुर्ती शासनाकडून केली जाते.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरातील दुचाकी वाहनांना नवीन ब्रेक प्रणाली बसवण्याबाबत

**(२३) १२४४७८ (०१-०८-२०१८). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील दुचाकी वाहनांना नवीन ब्रेक प्रणाली बसवण्याचा आदेश राज्य परिवहन आयुक्त कार्यालयाने माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिला असुन सदर आदेशाची अंमलबजावणीबाबत वितरक आणि परिवहन अधिका-यांमध्ये प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,गब
(२) असल्यास, सदर परिवहन कार्यालयाच्या आदेशाची अंमलबजावणी केल्यास पुणे शहरातील २६ लाख दुचाकींपैकी किमान २० लाख दुचाकी वाहनांना नवीन ब्रेक प्रणाली लावण्याबाबत तसेच तपासणी करण्याबाबात प्रादेशिक परिवहन विभाग, पुणे मार्फत सक्षम यंत्रणा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दुचाकी वाहनांच्या नव्या ब्रेक प्रणालीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१), (२) व (३) केंद्र शासनाच्या दिनांक २८.०४.२०१८ रोजीच्या अधिसूचनेव्दारे मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ९६ मधील उप नियम (४) नंतर (४ ए) नव्याने समाविष्ट केला आहे. त्यानुसार दुचाकी वाहनांना ॲन्टीलॉक ब्रेकींग सिस्टीम किंवा संयुक्त (कंबाइड) बेक्रींग सिस्टिम बसविणे अनिवार्य केले असून त्याबाबत अंमलबजावणी करण्यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर येथील नियोजित रेल्वे कोच फॅक्टरी उभारण्याबाबत**

**(२४) १२६४६२ (११-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर येथील नियोजित रेल्वे कोच फॅक्टरी उभारण्याबाबतच्या कामाची सद्यस्थिती काय आहे,
(२) असल्यास, या नियोजित फॅक्टरीचे काम केव्हा सुरुवात होणार असुन उभारणीचे काम किती कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे
(३) असल्यास,सदर प्रकल्पाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :**(१) (२) व (३) लातूर येथे कोच फॅक्टरी उभारण्यासाठी बांधकाम सुरु आहे.सदर कामास दिनांक ११.१०.२०१८ रोजी सूरवात केली असून दोन वर्षात काम पूर्ण होईल असे रेल्वे प्रशासनाने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) प्रादेशिक परिवहन कार्यालयातील अनेक रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२५) १२६५५७ (३०-११-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदांमुळे तसेच अपुऱ्या जागेमुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल प्रादेशिक कार्यालयामध्ये दररोज सरासरी १२०-१६० वाहनांची नोंदणी होत असून गाडयांची पासिंग, लायसन्स, चेकींग तसेच विविध कामे सहाय्यक मोटर वाहक निरिक्षक करित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदांमुळे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचा-यांवर कामाचा ताण पडत असून अपु-या जागेमुळे वाहने पार्किंग करताना नागरिकांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासह अपु-या जागेमुळे नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयात एकूण ६९ पदे मंजूर असून ५३ पदे भरलेली आहेत. सध्य:स्थितीत एकूण १५ पदे रिक्त असून त्यापैकी ८ सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक संवर्गातील, ४ लिपीक व टंकलेखक संवर्गातील व ३ इतर अशी पदे रिक्त आहेत. तसेच पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालय सध्या सिडकोच्या केंद्रिय सुविधा भवन, कळंबोली येथील भाड्याच्या जागेवर आहे.

(२) पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयात दररोज सरासरी २१२ नविन वाहनांची नोंद होते. सदर वाहन नोंदणी व इतर कामे १५ मोटार वाहन निरीक्षक व १० सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक संवर्गातील अधिका-यांमार्फत पार पाडली जातात.

(३) व (४) अंशत: खरे आहे.

सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक संवर्गातील पदे भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापी. मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांचे आदेश तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणी “स्टेट्स को” चे आदेश जारी केले आहेत. लिपिकवर्गीय कर्मचा-यांची ११ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे भरण्यात आली आहेत.

पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयास सिडकोकडून तळोजा नोड, सेक्टर ३० मधील जागेबाबत देकार कळविण्यात आला असून सदर कार्यालयास प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्धतेबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

**मुंबईतील परिवहन विभागाचे उपप्रादेशिक ताडदेव (आरटीओ) कार्यालयातील कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२६) १२७२८६ (३०-११-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.संजय कदम (दापोली), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.मधुसूदन केंद्रे (गंगाखेड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परिवहन विभागाचे उपप्रादेशिक ताडदेव (आरटीओ) कार्यालयातील कर्मचाऱ्यांची ६० टक्के पदे रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या जागा केव्हापासून रिक्त आहेत व त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील परिवहन विभागाचे उपप्रादेशिक ताडदेव कार्यालयातील कर्मचाऱ्यांची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :**

(१) होय, हे खरे आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) या कार्यालयात दि. ३१.१०.२०१८ रोजी एकूण २७४ पदे मंजूर असून १४४ पदे भरलेली आहेत. सध्य:स्थितीत एकूण १३० पदे रिक्त आहेत.

(२) व (३) सदर पदे सेवानिवृत्त, विभागबाह्य बदल्या व राजीनामे इत्यादी कारणांमुळे रिक्त झालेली आहेत.

सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक व मोटार वाहन निरीक्षक संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्यात येत आहेत. तसेच सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापी. मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ

यांचे आदेशावर मा. सर्वोच्च न्यायालयाने 'स्टेट्स को" चे आदेश जारी केले आहेत. लिपिकवर्गीय कर्मचा-यांची २८ पदे बाह्य स्त्रोतांद्वारे भरण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील अधिक्षक कृषि अधिका-यांनी तीन किटकनाशक औषध विक्री दुकानांच्या परवान्यांचे निलंबन केल्याबाबत**

**(२७) १२७३३१ (०७-१२-२०१८). श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील प्रयोग शाळेकडून औषधी नमुन्याचा तपासणी अहवाल येणे बाकी असतांनाही अधिक्षक कृषी अधिका-यांनी तीन किटकनाशक औषध विक्री दुकानांना त्यांच्या परवान्याचे निलंबन केल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहवाल अप्राप्त असतांना कारवाई करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,तद्नुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) किटकनाशक परवाना धारकांकडून किटकनाशक कायदयाच्या अधीन राहुन व्यवसाय केल्याप्रकरणी तपासणी व नमुने काढण्याचे अधिकार कायदयान्वये किटकनाशक निरीक्षकांना आहेत.
नांदेड जिल्हयात विभागीय तसेच जिल्हास्तरीय पथकाने पाहणी केली असता विना परवानगी, परवान्यात समावेश नसताना किटकनाशकांची विक्री हे किटकनाशक कायदा, १९६८ च्या कलम १० (४) (a) (i) च्या तरतूदींचे उल्लंघन होणे, किटकनाशके नियम, १९७१ मधील नियम १७ (१) (a) (c) (d), १७ (२) १८ (१) (c), १८ (२) मधील तरतूदीनुसार साठा रजिस्टर अद्यावत न ठेवणे, शेतकऱ्यांच्या बिलावर स्वाक्षरी न घेणे व मासिक खरेदी विक्री अहवाल नियमित सादर न करणे इत्यादी कारणामुळे माहे, सप्टेंबर, २०१८ व त्या दरम्यान एकूण आठ किटकनाशक दुकानांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहेत. सदर आठ विक्रेत्यांची सुनावणी घेण्यात आली असता, या विक्रेत्यांनी त्रुटी मान्य करुन त्रुटींची पूर्तता करुन घेण्याचे मान्य केलेले आहे.किटकनाशक नमुना काढून प्रयोगशाळेत पाठवून नमुन्यांचे निकाल अप्रमाणित जाहिर झाल्यास न्यायालयात किटकनाशक कायदयानुसार कोर्ट केस दाखल करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत**

**(२८) १२७३३३ (०४-१२-२०१८). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पत्नीसमवेत वर्षभर मोफत प्रवास पास, वाढीव पेन्शन, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वैद्यकीय सुविधेचा लाभ मिळावा, अशी मागणी सेवा निवृत्ती एस.टी. कर्मचाऱ्यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसटी महामंडळाने महामंडळाच्या बस मधून वर्षातून सहा महिने निवृत्त कर्मचाऱ्यांना पत्नीसमवेत मोफत प्रवास करण्याची सवलत देण्याचा निर्णय दिनांक १२ सप्टेंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, एक्झामटेड व नॉन एक्झामटेड विषयी असलेले परिपत्रक रद्द करावे, अशीही मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या मागण्यांच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे कय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातून सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना व त्यांच्या पत्नी/पतीला दि.०१.१२.२०१८ च्या परिपत्रकांन्वये वर्षातून एकूण सहा महिने मुदतीचा मोफत पास माहे जुलै ते फेब्रुवारी या कालावधीत देण्याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

तसेच, सेवानिवृत्तीनंतर संबधित कर्मचारी व त्यांच्या पत्नीस ते ज्या ठिकाणी स्थायिक झाले असतील त्या ठिकाणापासून जवळ असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या दवाखान्यातील मानसेवी वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्ला व त्याच दवाखान्यातून दिलेली औषधे इ. सेवा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या कर्मचारी निवृतीवेतन योजना १९९५ मधील वाढीव लाभाबाबतच्या निर्णयाबाबत केंद्रीय भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने दि.३१.०५.२०१७ रोजी परिपत्रक प्रसारित करुन, ज्या आस्थापनांचे भविष्य निर्वाह निधी वर्गणी व अंशदान भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे जमा होते, अशाच (Unexempted) आस्थापनांना मा.सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लागू होईल, अशा सूचना प्रसारित केलेल्या आहेत.

राज्य परिवहन महामंडळाने स्वतंत्र विश्वस्तमंडळ स्थापित केले असल्यामुळे कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी वर्गणी व अंशदान (निवृत्ती वेतनाचे अशंदानवरील) भविष्य निर्वाह निधी कार्यालयाकडे न पाठवता विश्वस्त महामंडळाकडे जमा होत असल्यामुळे

(exempted) सदर निर्णय महामंडळाला लागू नाही. तरी, सदरबाबत केंद्रीय भविष्य निर्वाह निधी आयुक्त यांना महामंडळाद्वारे दि.३०.१०.२०१७ च्या पत्रान्वये अधिक स्पष्ट सूचना देण्याची विनंती केली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पनवेल येथे महिलांसाठी राखीव असलेल्या रिक्षा स्टँडवर पुरुष रिक्षाचालक अतिक्रमण करीत असल्याबाबत

**(२९) १२७३५४ (११-१२-२०१८). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल येथे महिलांसाठी राखीव असलेल्या रिक्षा स्टँडवर पुरुष रिक्षाचालक अतिक्रमण करीत असून सोसायटी नाका व पनवेल शहरात इतर ठिकाणी रिक्षा लावण्यास आडकाठी करीत असल्याच्या तक्रारी माहे सप्टेंबर, २०१८ वा त्यादरम्यान संबधित अधिका-यांकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार पनवेल येथे महिलांसाठी राखीव असलेल्या रिक्षा स्टँडवर अतिक्रमण करित असलेल्या पुरुष रिक्षाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०२-२०१९) :** (१) माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये नवीन पनवेल येथे पुरूष रिक्षा चालकांकडून महिलासांठी राखीव असलेल्या रिक्षा स्टँडवर अतिक्रमण, महिला रिक्षाचालकांना इतर रिक्षा स्टँडवर रिक्षा उभी करण्यास मज्जाव हे प्रकार घडत असल्याचे पनवेल येथील महिला रिक्षाचालकांनी उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांची भेट घेवून तोंडी अवगत केलेले आहे.
(२) व (३) पनवेल येथील महिला रिक्षा चालकांनी वरीलप्रमाणे घडत असलेल्या घटना उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना तोंडी अवगत केल्यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयाच्या वायुवेगपथकातील अधिकारी यांनी पुरूष व महिला रिक्षाचालक, खांदेश्वर पोलिस ठाणे येथील पोलिस निरिक्षक व प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल या कार्यालयाचे कार्यकारी अधिकारी यांची बैठक घेऊन दोन्ही रिक्षा चालकांचे प्रश्न समजून घेऊन त्यांना यापुढे कोणत्याही प्रकारे महिला रिक्षाचालकांना त्रास होणार नाही, याबाबत पुरुष रिक्षाचालकांना सूचित करण्यात आलेले आहे.
महिला रिक्षा चालकांना पुरूष रिक्षाचालकांकडून होत असलेल्या त्रासाबाबत संबंधित महिला रिक्षा चालकांनी खांदेश्वर पोलिस ठाणे, पनवेल येथे अदखलपात्र गुन्हा दाखल केलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात ट्रॅव्हल्सवाल्यांची मनमानी सुरु असल्याबाबत

**(३०) १२७४९३ (११-१२-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी (जि.सांगली) तालुक्यात ट्रॅव्हल्सवाल्यांची मनमानी सुरु असल्याने त्या विरोधात विभुतवाडीचे सरपंच यांनी दिनांक १७ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास लढा सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ट्रॅव्हल्सवाल्यांनी मनमानी कारभाराबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या ट्रॅव्हलवाल्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१) हे खरे नाही.

अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

(२) खाजगी बसेस प्रचालकांकडून मनमानी भाडे आकारणीबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे त्या-त्या संवर्गातील टप्पा वाहतूकीचे भाडेदर विचारात घेऊन खाजगी कंत्राटी परवाना वाहनाचे त्या त्या संवर्गासाठी संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रती कि.मी. भाडे दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक राहणार नाही, असे कमाल भाडेदर दिनांक २७.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहे.

(३) आवाजवी भाडे आकारणीच्या संबंधाने एकही दोषी वाहन आढळलेले नाही. तथापि, उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या तपासणी पथकाने माहे एपिल, २०१८ ते ऑक्टोबर, २०१८ दरम्यान एकूण ४९६ बसेस तपासून अन्य गुन्हयाकरीता २१ दोषी वाहनांवर कारवाई करून एकूण रू.२७७६९/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पात्र उमेदवारांना वाहन परवाना थेट हातात देण्याच्या उपक्रमाबाबत

**(३१) १२७६३० (१५-१२-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पात्र उमेदवारांना त्याच दिवशी वाहन परवाना थेट हातात देण्याच्या उपक्रमाला कोल्हापूर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात प्रयोगिक तत्वावर सुरु असलेला हा उपक्रमास तात्पुरती स्थगिती माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू उपक्रम पुन्हा सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) व (२) महाराष्ट्र मोटार वाहन नियमातील तरतूदींनुसार वाहन परवाना आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र पोस्टाने पाठविण्याची तरतूद आहे. सदर परवाना आणि प्रमाणपत्र हस्तदेय उपक्रम प्रथम कराड कार्यालयात प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येऊन त्यानंतर कोल्हापूर कार्यालयातही सदर उपक्रमाचा विस्तार करुन पाहणी करण्यात आलेली आहे. याबाबत पुढील धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोणार-जळगांव (जि.बुलढाणा) ही बसफेरी बंद असल्याबाबत**

**(३२) १२८०१८ (१०-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार-जळगांव (जि.बुलढाणा) ही बसफेरी मागील ८ महिन्यापासून बंद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही बस फेरी बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोणार-जळगांव ही बस फेरी सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) लोणार-जळगांव (जि.बुलढाणा) अशी बसफेरी अस्तित्वातच नाही. लोणार-जळगांव (खानदेश) ही फेरी चालनात असून, सदर फेरी नियमितपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाने प्रवाशासाठी वापरात नसलेल्या बसेसचा वापर माल वाहतुकीसाठी करण्याबाबत**

**(३३) १२८१७० (१०-१२-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाने संचित तोटयातून बाहेर पडण्यासाठी प्रवाशासाठी वापरात नसलेल्या बसेसचा वापर माल वाहतुकीसाठी करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावाच्या मंजुरीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) व (२) राज्य परिवहन महामंडळाद्वारे माल वाहतूक सेवा सुरु करण्याबाबत शासनाकडून मान्यता मिळण्यासाठी शासन निर्णयानुसार गठित केलेल्या संबंधित प्रकल्प निष्कासन समितीस दि.१९.१२.२०१७ रोजी प्रस्ताव सादर केला होता. प्रकल्प निष्कासन समितीने दि.१७.०२.२०१८ रोजी घेतलेल्या बैठकीत माल वाहतूक सेवा कार्यान्वित करण्याकरीता तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करावा व मंत्रीमंडळास सादर करण्यात यावा, असा निर्णय दिला होता. त्याप्रमाणे तपशीलवार प्रकल्प अहवाल तयार करण्याकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणूक करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बऱ्हाणपूर-जालना-खंडवा येथील प्रवाशांना देण्यात येणा-या तिकिटावर अनधिकृत भाडे आकारले जात असल्याबाबत**

**(३४) १२८२३७ (११-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्हा व मध्यप्रदेशची सीमा जवळच असल्यामुळे मध्यप्रदेशातील मध्यप्रदेश परिवहन महामंडळाद्वारा खाजगी पध्दतीने अनेक बस बुलढाणा जिल्हयात प्रवासी सेवा देत असून बस वाहकांकडून ग्रामीण भागातील बऱ्हाणपूर-जालना-खंडवा येथील प्रवाशांना देण्यात येणा-या तिकिटावर अधिकृत भाडे नमूद न करता जास्तीचे भाडे नमूद करण्यात येत असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१३-०२-२०१९) :** (१) अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात दि.०७.०७.२०१८ रोजी प्रसिध्द झालेली आहे.
तथापि, याबाबत कुठल्याही स्वरूपाची तक्रार वा निवेदन उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(२) व (३) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा यांचे कार्यक्षेत्रात कार्यरत असलेल्या वाहनांची वायुवेग पथकाव्दारे नियमितपणे तपासणी केली जाते व अंमलबजावणी दरम्यान दोषी आढळणाऱ्या वाहनांवर तसेच वाहनधारकांवर नियमानुसार कारवाई करण्यात येते. सदर बातमीत नमूद मध्यप्रदेशातील परिवहन महामंडळाच्यावतीने त्या महामंडळाने प्राधिकृत केलेल्या खाजगी प्रवासी वाहतूकदारांमार्फत चालविण्यात येणाऱ्या बसची उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा कार्यालयाच्या वायुवेग पथकाव्दारे तपासणी केली असता अधिकृत भाडयापेक्षा जास्त भाडे आकारण्यात आले असल्याचे आढळून आले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर येथील महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाच्या कार्यालयात झालेला गैरव्यवहार**

**(३५) १२८२७८ (०४-१२-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथील महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाच्या कार्यालयात सुमारे १ कोटी २० लाख रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयातील व्यवहाराचा ताळमेळ घालण्यासाठी जिल्हापरिषद व तालुका कृषी अधिकाऱ्यांकडून सन २००८-०९ पासूनची माहिती व कागदपत्रे विभागीय व्यवस्थापक, नाशिक यांनी मागविली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुसार अहमदनगर येथील महाराष्ट्र कृषी उद्योग महामंडळाच्या कार्यालयातील गैरव्यवहाराबाबत कार्यवाही करुन संबंधिताविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आह,,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाच्या नाशिक अंतर्गत उप विभागीय कार्यालय अहमदनगर येथे सन २०१२ ते जानेवारी २०१७ मध्ये, श्री. आर. बी. कुलट, लिपीक, श्री. आर.बी. होले, सहायक व्यवस्थापक (पणन), श्री. एम. एम. राजुरकर, सहायक व्यवस्थापक (पखा) यांनी महामंडळाच्या कृषी अभियांत्रिकी विभागाच्या वसुलीपोटी प्राप्त झालेल्या रकमांचा धनादेश/ धनाकर्ष हे खाजगी खत वितरकांच्या खात्यावर जमा करुन रु. १.२० लाख इतक्या रकमेचा आर्थिक गैरव्यवहार केलेला आहे प्रस्तुत प्रकरणी, सर्वश्री. होले, राजुरकर, सहाय्यक व्यवस्थापक व श्री. कुलट, लिपीक यांना निलंबित करुन, निवृत्त न्यायाधीश ॲड. बावकर यांच्यामार्फत विभागीय चौकशी सुरु करण्यात आली होती. सदर विभागीय चौकशीमध्ये त्यांच्याविरुध्द आरोप सिध्द झाले आहेत. त्यानुषंगाने, मुख्य आरोपी श्री. कुलट यांनी गुन्हा मान्य केला असून त्यांना सेवानियमानुसार सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे. तसेच, त्यांचेकडून रु. २३.१८ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. याशिवाय, श्री. होले व श्री. राजुरकर यांच्या चार वार्षिक वेतनवाढी कायमच्या थांबविण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर व लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील मानव विकास मिशनच्या बसेसचे नियोजन विस्कळीत झाल्याबाबत**

**(३६) १२८५०४ (१०-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर व लोणार (जि.बुलढाणा) तालुक्यातील ग्रामीण भागातून हजारो मुली दररोज शिक्षण घेण्यासाठी तालुक्यात येत असुन मानव विकास मिशनच्या बसेसचे नियोजन विस्कळीत झाल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे माहे जुलै, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत गट शिक्षणाधिकारी, मेहकर यांनी आगार व्यवस्थापक यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असलयास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) व (२) मानव विकास कार्यक्रमानुसार दि.२५.०६.२०१८ पासून मेहकर तालुक्याकरीता मिळालेल्या ८ बसेसद्वारे ८ मार्गांवर, तसेच, लोणार तालुक्याकरीता मिळालेल्या ७ बसेसद्वारे ७ मार्गांवर नियोजनानुसार मानव विकास फेऱ्या महामंडळाद्वारे नियमित सुरु आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लोणार (जि.बुलढाणा) बसस्थानकांच्या सुशोभीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(३७) १२८८४७ (१०-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोणार (जि.बुलढाणा) बसस्थानकांच्या सुशोभीकरणाचे काम मागील दोन वर्षापासून प्रलंबित असल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू काम प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोणार बसस्थानकांचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) (२) व (३) राज्य परिवहन महामंडळाच्या लोणार बसस्थानकाचे नुतनीकरण व दर्जा वाढ करणेच्या कामास रु.१.०० कोटी रक्कमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त असून, सदर कामाचा कार्यादेश दि.२६.०५.२०१७ रोजी देण्यात आला आहे. तथापि, बसस्थानकाच्या कामाची बांधकाम परवानगी दि.०२.०५.२०१८ रोजी प्राप्त झाली असून, सद्यस्थितीत काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंढरीपाडा (ता.कळवण, जि.नाशिक) येथे अंगावर वीज कोसळून तरुणाचा झालेला मृत्यू**

**(३८) १२८९४६ (१०-१२-२०१८). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाचेर (पंढरीपाडा) (ता.कळवण, जि.नाशिक) येथील श्री रवींद्र संतोष पवार या तरुणाचा वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात अंगावर वीज कोसळून मृत्यू झाल्याचे दिनांक १३ ऑक्टोंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर तरुणांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) (२) व (३) चाचेर (पंढरीपाडा), ता. कळवण, जि. नाशिक येथील श्री. रवींद्र संतोष पवार या तरुणाचा वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात अंगावर वीज कोसळून दि. ११/१०/२०१७ रोजी मृत्यू झाल्याचे निदर्शनास आले.

त्याअनुषंगाने श्री. रवींद्र संतोष पवार यांच्या वारसांना शासन निर्णय दिनांक १३.०५.२०१५ मधील तरतूदींनुसार ४ लक्ष रुपये मदतीचा धनादेश अदा करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सातारा येथील मुख्य बस स्थानक परिसर स्चच्छ करण्याबाबत**

**(३९) १२९३३९ (१०-१२-२०१८). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथील मुख्य बस स्थानकात शासनाच्या दुर्लक्षामुळे जागोजागी पडलेल्या कचरा व दुर्गंधीमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढत असून प्रवाशांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्वच्छतागृहात दैनंदिन स्वच्छता केली जात नसल्याची तक्रार प्रवाशांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर बस स्थानक परिसर स्वच्छ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) व (२) नाही.
(३) राज्य परिवहन महामंडळाच्या सातारा आगारातील बसस्थानक व बसस्थानक परिसराची ब्रीक्स इंडिया कंपनीमार्फत दररोज नियमितपणे स्वच्छता केली जाते. तसेच, बसस्थानकातील प्रसाधनगृहाची स्वच्छता सुलभ इंटरनॅशनल संस्थेमार्फत नियमितपणे केली जात आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अहिल्यादेवी होळकर योजनेंतर्गत १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना एसटी प्रवासासाठी मोफत पास देण्याबाबत**

**(४०) १२९३७५ (१५-१२-२०१८). श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहिल्यादेवी होळकर योजनेंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील १२वी पर्यत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थींना एसटी प्रवासासाठी मोफत पास देण्याचा निर्णय राज्यमंत्री मंडळाच्या बैठकीमध्ये माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये ज्येष्ठ नागरिक, अंध, अपंग, अधिस्विकृतीधारक पत्रकारांनाही वातानुकुलीन शिवशाही बसमध्ये सदरहू सवलत देण्यात येणार असुन शहरी भागातील १२वीच्या विद्यार्थीनीना सदर योजना शासन लागू करणार आहे , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सवलतीचा राज्य सरकारला वर्षाला सुमारे १८०० कोटी रुपयाचा अतिरिक्त भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन १२वी पर्यतच्या विद्यार्थींना एसटी प्रवासासाठी मोफत पास देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) व (२) शासन निर्णय, दि.०९.१०.२०१८ अन्वये अहिल्यादेवी होळकर योजनेंतर्गत राज्यातील ग्रामीण भागातील ५ वी ते १२ वी पर्यत शिक्षण घेणाऱ्या विदयार्थीनींना एसटी प्रवासासाठी मोफत पास देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतू, शहरी भागातील विद्यार्थीनींना सदरहू सवलत योजना अनुज्ञेय नाही.

तसेच, ६५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना शिवशाही आसनी बसमध्ये ४५ टक्के व शिवशाही शयनयान बसमध्ये ३० टक्के प्रवास सवलत अनुज्ञेय आहे. तसेच, अधिस्विकृतीधारक पत्रकार यांना शिवशाही बसमध्ये १०० टक्के प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आली आहे.

अंध व अपंग व्यक्तींना साधी व निमआराम बसच्या प्रवासभाडयात सवलत लागू करण्यात आलेली आहे. परंतु, त्यांना शिवशाही बसने प्रवास सवलत अनुज्ञेय करण्यात आलेली नाही.

(३) नाही. राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमधून देण्यात येणाऱ्या सदर सवलतींचा शासनावर एकूण अंदाजित आर्थिक भार रु.१३६९ कोटी इतका होईल.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील बोरिवली पूर्वेमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नॅन्सी एसटी आगाराची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४१) १३०१६० (११-१२-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बोरिवली पूर्वेमध्ये महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अखत्यारित असलेला नॅन्सी एसटी आगाराची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आगाराच्या आवारात चिखल व घाणीचे साम्रज्य पसरले असून आसन व्यवस्था जीर्ण झाली असल्याने प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबईतील बोरिवली पूर्वेमधील उक्त आगाराच्या दुरुस्ती व देखभालीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१), (२) व (३) नॅन्सी कॉलनी येथे महामंडळाचे ४ गाळयांचे बसस्थानक असून, सदर बसस्थानकात प्रवाशांना बसण्यासाठी आसन व्यवस्थेसह प्रतिक्षालय, पिण्याचे पाणी, लाईट, पंखे, तिकिट आरक्षण, चौकशी कक्ष, महिला व पुरुष लघुशंकेची व्यवस्था, उपहारगृह, चालक/वाहकांना विश्रातीगृह इ. मुलभुत सुविधा उपलब्ध आहेत.

सदर बसस्थानकाच्या वाहनतळाचे डांबरीकरण सुस्थितीत असून, बसस्थानक आवारास कुंपणभिंत आहे. बसस्थानक व आवाराची दैनंदिन साफसफाई करण्यासाठी ब्रीक्स इंडिया प्रा.लि. पुणे यांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांचेकडून नियमितपणे साफसफाई केली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात पडलेल्या अवकाळी व वादळी पावसामुळे होणा-या घरांचे व मालमत्तेची नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(४२) १३०६८४ (१०-१२-२०१८). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे एप्रिल व मे महिन्यांमध्ये प्रतिवर्षी होणा-या अवकाळी व वादळी पाऊस तसेच सुसाटयाच्या वा-यामुळे ग्रामीण भागातील जुन्या घरांचे पत्रे उडून जात असुन सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नुकसानग्रस्तांना नुकसान झालेल्या सार्वजनिक मालमत्तेचे पुर्नबांधणी करण्याकरिता तातडीने मदत मिळण्यासाठी नुकसानीचा पंचनामा केला असता त्या विभागात ६५ मि.मी पाऊस पडला असेल तरच नुकसान भरपाई दयावी अशी शासनाची सन १९८८ मध्ये अट असल्यामुळे मोठया प्रमाणात नुकसान होवून देखील नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई दिली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भातील सदरहू अट शासनाने रद्द करुन तेथील वस्तुस्थिती पाहून महसूल विभागामार्फत तातडीची मदत देणेसंदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मागणी नुकसानग्रस्तांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई मिळणेसह सार्वजनिक मालमत्तेची पुर्नबांधणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३१-०१-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.

(४) राज्यात माहे एप्रिल, २०१८ व माहे मे, २०१८ मध्ये अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या व फळपिकांच्या नुकसानीबाबत संयुक्त पंचनामे करुन नुकसानीचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना अनुक्रमे शासन पत्र दिनांक १८.४.२०१८ व दिनांक १९.६.२०१८ अन्वये देण्यात आल्या होत्या. क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने शासन निर्णय दिनांक १८.१२.२०१८ अन्वये माहे एप्रिल २०१८ मधील अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीसाठी रु. ८,१४,९८,५४०/- व माहे मे २०१८ मधील अवेळी पाऊस व गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीसाठी रु. २,९३,००,६५५/- एवढ्या मदतनिधीचे वाटप बाधितांना करण्यासाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे अमडापूर (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथील बस स्थानकांच्या बांधकामाबाबत**

**(४३) १३०७३० (१०-१२-२०१८). श्री.राहुल बोंद्रे (चिखली)** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे अमडापूर (ता.चिखली, जि. बुलढाणा) येथील बस स्थानकाची दुरावस्था झाली असुन नवीन बांधकाम होण्यासाठी विभागाकडून निधी मंजुर करण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बस स्थानाकाच्या बांधकामसाठी निधी मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०७-०२-२०१९) :** (१) व (२) अमडापूर बसस्थानक नव्याने बांधण्यासाठी रु.१.२५ कोटी इतका निधी मंजूर असून, सद्यस्थितीत बसस्थानकाचे काम सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराच्या नुतनीकरणाचे काम सुरू करण्याबाबत**

**(४४) १३१४८३ (१०-१२-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) राज्य परिवहन महामंडळाच्या बस आगाराच्या नुतनीकरणाच्या नियोजित आराखडयाला परिवहन महामंडळाकडून अद्यापपर्यंत मंजूरी न मिळाल्यामुळे मागील अनेक वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या बस आगाराचे काम अद्यापपर्यंतही सुरू झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल बस आगारातून दररोज हजारो राज्य परिवहनच्या बस येत असून आगाराच्या दयनीय अवस्थेमुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गेल्या अनेक वर्षापासून प्रतिक्षेत असलेल्या पनवेल राज्य परिवहन मंडळाच्या बस आगाराच्या नुतनीकरणाचे काम सुरू करण्यासाठी नियोजीत आराखडयाला मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) पनवेल येथे आधुनिक बसतळासह (बसपोर्ट) व्यापारी संकुल बांधणे या प्रकल्पातंर्गत पनवेल येथे आगार, बसस्थानक, इतर आस्थापना, सदनिका व वाणिज्य आस्थापना यांचा समावेश आहे. या कामांसाठी महामंडळाने ई-निविदा प्रक्रियेद्वारे मे.एडूस पार्क इंटरनॅशनल या विकासकाची निवड केली आहे. या विकासकाने सादर केलेल्या नियोजित आराखडयाला महामंडळाने दि.२८.११.२०१८ च्या पत्रान्वंये मंजूरी दिली आहे.
(२) नाही.

प्रवाशांच्या सोयीसाठी आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरविण्यात आल्या आहेत.
(३) विकासकाने सादर केलेल्या नियोजित आराखडयामध्ये भविष्यातील वाहतूकीच्या दृष्टीने वेळोवेळी बदल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे त्याचे सादरीकरण राज्य परिवहन महामंडळातील सर्व विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत करुन त्यांच्या अभिप्रायांनुसार आराखडयास अंतीम मंजूरी देण्यात आली आहे व सदर प्रकल्पाचा ले-आऊट नकाशा व बांधकाम परवानगी मिळणेबाबतचा प्रस्ताव पनवेल महानगरपालिकेकडे सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## इचलकरंजी (जि.कोल्हापूर) येथे प्रादेशिक परिवहन विभागाचे ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅक सह कॅम्प कार्यालय सुरू करण्याबाबत

**(४५) १३१५४६ (१०-१२-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
**(१)** इचलकरंजी (जि. कोल्हापूर) येथे प्रादेशिक परिवहन विभागाचे ड्रायव्हिंग टेस्ट ट्रॅकसह कॅम्प कार्यालय सुरू करण्याचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचे कार्यालय सुरु करण्यासाठी इचलकरंजी नगरपालिकेने मध्यवस्तीतील जागा दिलेली असून जागेचे भाडे निश्चिती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येते, हे ही खरे आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रादेशिक परिवहन विभागाच्या कॅम्प कार्यालय सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) : (**१), (२) व (३) कोल्हापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे इचलकरंजी येथे नगरपालिकेच्या जागेवर भाडेतत्वावर कॅम्प कार्यालय सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाहने खरेदी करताना घेतलेल्या कर्जाची नोंदीबाबत**

**(४६) १३२११९ (११-१२-२०१८). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाहने खरेदी करताना घेतलेल्या कर्जाची नोंद संबंधित बँकेच्या वतीने परिवहन अधिकारी रजिस्टर सर्टीफीकेटवर करत असुन कर्जाची पूर्ण फेड केल्यानंतरही परिवहन अधिकारी अशा नोंदी आर-सी-बुकावरून कमी करत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) : (**१) हे खरे नाही.

वाहनमालकाने वित्तदात्याकडून हप्तेबंदीने, भाडेपट्टा पद्धतीने वा वाहनतारण कराराने कर्ज घेऊन वाहन खरेदी केल्यास कर्जबोजा कराराची नोंदणी करावयाची तरतुद मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ५१ (१) मध्ये आहे त्यासाठी केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ६० अन्वये विहित केलेल्या नमूना ३४ मध्ये अर्ज केल्यास नोंदणी प्रमाणपत्रावर तसेच नमूना २४ मध्ये कर्जाची नोंद घेण्यात येते. तसेच मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम ५१ (३)मधील तरतुदीनुसार कर्ज बोजा करार संपूष्टात आले बाबतचा पुरावा सादर केल्यास आणि केंद्रीय मोटार वाहन नियम,१९८९ च्या नियम ६१ अन्वये विहित केलेल्या नमूना ३५ मध्ये वित्तदाता व नोंदणीकृत मालक यांनी कर्जबोजा करार संपुष्टात आले बाबत नोंदणी प्राधिका-यास विहित शुल्कासह अर्ज सादर केल्यास उक्त करार संपुष्टात आलेबाबतची नोंद नोंदणी प्रमाणपत्रातून तसेच नमूना २४ मधून कमी करण्याची तरतुद आहे.

(२) याबाबत शासनाने सेवा हमी कायद्यानुसार विहित वेळेत कार्यवाही करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील ताडदेव, वडाळा, अंधेरी आणि बोरीवली येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात टेस्ट ट्रकच्या समस्या सोडविण्याबाबत**

**(४७) १३२३१० (११-१२-२०१८) श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ताडदेव, वडाळा, अंधेरी आणि बोरीवली येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये वाहनांच्या फिटनेस सर्टिफिकेटसाठी अनिवार्य असलेला स्वतंत्र २५० मिटरचा ट्रक उपलब्ध नसल्याने फिटनेस सर्टिफिकेटसाठीची तपासणी थांबविण्यात आली असल्याने मुंबईतील सुमारे सात हजार नवीन आणि जुन्या रिक्षा, टॅक्सी, ट्रक अशा सुमारे २० हजार वाहनांचा व्यवसाय अडचणी असल्याचे दिनांक १९ ऑक्टोंबर, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू टेस्ट ट्रकची समस्या न सोडविल्यास मुंबईतील बेस्ट बस व रुग्णवाहिकांचही नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन मुंबईतील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयातील टेस्ट ट्रकच्या समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) : (**१), (२) आणि (३) अंशतः खरे आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय,मुंबई (मध्य) या कार्यालयासाठी ब्रेक टेस्ट ट्रॅक उभारण्याच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दि.२२.१०.२०१८ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालय,मुंबई (पूर्व) या कार्यालयास बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट) यांच्या मालकीच्या आणिक डेपो, वडाळा येथे वाहनधारकांकडून जागेच्या भाड्यापोटी अतिरीक्त शुल्क आकारुन वाहनांची ब्रेक व योग्यता प्रमाणपत्र चाचणी घेण्यास शासन पत्र दि.२२.०१.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच कुर्ला,मुंबई येथील नेहरुनगर एस.टी. डेपो येथे ऑटोमोटीव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडीया,पुणे यांचेमार्फत वाहन निरीक्षण आणि परिक्षण केंद्र स्थापन करण्यास शासन निर्णय दि.२२.०१.२०१९ अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय,बोरीवली या कार्यालयाच्या ब्रेक टेस्ट ट्रॅकसाठी आरे दुग्ध वसाहत गोरेगाव येथील वापरात नसलेला रस्ता मासिक भाडेपट्टी करारावर घेण्यास शासन निर्णय दि.०७.१२.२०१८ अन्वये प्रशासकीय मंजूरी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) तालुक्यालगत विदर्भ व मराठवाडयाला जोडणारी एकमेव देऊळगाव राजा ते शेवली ही बस सेवा बंद असल्याबाबत**

**(४८) १३२३६४ (१०-१२-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) तालुक्यालगत विदर्भ व मराठवाडयाला जोडणारी एकमेव देऊळगाव राजा ते शेवली ही बस सेवा दिनांक १ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ही बस सेवा बंद करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू बस सेवा पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) व (२) देऊळगांव राजा ते शेवली या फेरीचे भारमान २० टक्के असून, अत्यल्प प्रवाशी प्रतिसादामुळे देऊळगांव राजा ते शेवली बस फेरी दि.०४.०७.२०१८ पासून बंद करण्यात आली आहे.

(३) राहेरी व शेवली येथील प्रवाशांची गैरसोय टाळण्याकरीता दुसरबीड ते शेवली मार्गे राहेरी ही ०६.०० वाजेची विदर्भ व मराठवाडयाला जाणारी फेरी दि.०४.०७.२०१८ पासून सुरु करण्यात आलेली आहे. तसेच मेहकर-शेवली मार्गे राहेरी ही १३.३० ची फेरी चालनात आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सातपूर व अंबड (जि.नाशिक) औद्योगिक वसाहतीत सातपूर बसस्थानकांचे काम अपुणावस्थेत असल्याबाबत

**(४९) १३३१७४ (१०-१२-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हयातील सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीत येणा-या हजारो कामगारांसह परिसरातील नागरिकांसाठी सन २०१५ मध्ये सातपूर बसस्थानकांचे काम सुरु करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बसस्थानकांचे काम चार वर्षापासून अद्याप अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बसस्थानकांचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०८-०२-२०१९) :** (१) होय.
(२) व (३) सातपूर येथे महामंडळाच्या एमआयडीसी येथील जागेत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे निधीतून सहा फलाटांचे बसस्थानक बांधण्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे हाती घेण्यात आलेले आहे. सदर कामास शासनाद्वारे मंजूर रु.१५०.०० लक्ष इतक्या निधीपैकी रु.१२०.०० लक्ष निधी प्राप्त झालेला होता.

सदर बसस्थानकाच्या कामामध्ये काही बाबींची परिमाणे वाढल्यामुळे प्राप्त निधी अपुरा पडत होता. सद्यस्थितीत बसस्थानकावर संपूर्ण आर.सी.सी. काम व छताचे काम पुर्ण झालेले आहे. उर्वरित काम पुर्ण करण्यासाठी शासनाकडून रु.५०.०० लक्ष इतक्या रक्कमेचा निधी प्राप्त झालेला असून, उर्वरित कामाची नविन दरसूचीनुसार निविदा मागविण्यात येवून पुढील काम पुर्ण करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यात रब्बी हंगामात शेतकरी, शेतमजुरांना कीटकनाशक फवारणीमुळे विषबाधा झाल्याबाबत

**(५०) १३४७४७ (०७-१२-२०१८). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यात सन २०१७-१८ मध्ये रब्बी हंगामात १०४ शेतकरी, शेतमजुरांना किटकनाशक फवारणीमुळे विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले असुन किटकनाशक फवारणीमुळे

आरोग्य बाधित झालेल्या शेतमजूर व शेतकरी यांची आरोग्य तपासणी करण्याबाबत मा. राज्यपाल यांनी दिनांक २६ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास अधिसूचना प्रसिद्ध करून किटकनाशकांमुळे विषबाधा, मृत्यू झालेल्यांचा अहवाल देण्याच्या आदेश निर्गमित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्गमित अधिसूचनेनुसार विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अकोला जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग, जिल्हा पोलीस अधीक्षक, जिल्हा कृषी अधीक्षक, अकोला यांना सदर प्रकरणी विशेष अभियान राबविण्यासाठी दिनांक ६ ऑगस्ट २०१८ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्देशानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (३०-०१-२०१९) :** (१) अंशत:खरे आहे.

अकोला जिल्हयामध्ये सन २०१७-१८ च्या रब्बी हंगामात एकूण ७८ शेतकरी / शेतमजूर यांना किटकनाशक फवारणीमुळे विषबाधा झाल्याचे निदर्शनास आले आहे. दिनांक २६/०३/२०१८ रोजी राज्य शासनाने प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेव्दारे किटकनाशकांच्या वापरामुळे होणाऱ्या विषबाधेसंबंधी अहवाल सादर करण्यासाठी क्षेत्रीय स्तरावरील वेगवेगळया विभागातील अधिकाऱ्यांना प्राधिकृत केलेले आहे.

(२) होय.

(३) जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांना प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत किटकनाशक फवारणी करणाऱ्या शेतमालक व शेतमजुरांची वर्षातून किमान एकदा शारीरीक तपासणी करुन घेणेबाबत व वैद्यकीय प्रमाणपत्राचा अहवाल देणेबाबत कळविले होते. त्यानुसार ,जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांनी प्रथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात शेतकरी / शेतमजूर यांची विशेष तपासणी अभियान राबविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **जितेंद्र भोळे**

**मुंबई.** **सचिव (कार्यभार),**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.